# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०६/२०२५ (मंगळवार)**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद १आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक ०९/०६/२०२५ रोजी केळवद पोलीस पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिति मिळाली की, मध्य प्रदेश पांढुर्णा कडुन केळवद मार्गे नागपूर कडे प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची अवैधरित्या वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी रामपुरी फाटा येथे नाकाबंदी केली असता पांढुर्णा कडुन **कार क्र एम.एच—३१ ए.जी.—३०७७** येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक आरोपी नामे आकाश अरविंदजी धुरई, वय—२९ वर्षे, रा. बारीपुरा, वार्ड क्र. ६, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि. नागपुर,याचे ताब्यातुन १) सुगंधित च्वुइंग तबांखु; बागबान —४७ ब्रॅन्ड ,२) प्रिमीयम पान मसाला पान पराग ब्रॅन्ड ३) पान मसाला राजश्री ब्रॅन्ड ४) पान मसाला विमल ब्रॅन्ड ५) फ्लेवर्ड पान मसाला रजनीगंधा ब्रॅन्ड ६) सुगंधित तबांखु रत्ना—३०० ब्रॅन्ड ७) सुगंधित तबांखु व्हि—१ ब्रॅन्ड ८) सुगंधित तबांखु डबल ब्लॅक—१८ ब्रॅन्ड या ब्रॅडचे एकुण ६३.२६ किलो प्रतिबंधित सुगंधी तंबाखु साठा, किंमती ९६,४४१/—रूपये, तसेच चारचाकी वाहन कार क्र एम.एच. ३१ ए.जी.३०७७ किंमती ३,२०,०००/—रूपये असा एकुण ४,१६,४४१/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे आकाश अरविंदजी धुरई, वय—२९ वर्षे, रा. बारीपुरा, वार्ड क्र. ६, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपुर याला सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा

व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## रामटेक परीसरात वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद. एका पिडीतेची सुटका ,एक आरोपी अटक रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेकः—** दिनांक ०९/०६/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, हॉटेल न्यु रसोई , घोटीटोक शिवार येथे महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करून घेत आहे. अशी माहीती मिळाल्याने हॉटेल न्यु रसोई , घोटीटोक शिवार येथे पोलीसांनी धाड टाकली असता **आरोपी नामे— १) मंगेश बापुराव कारेमोरे, वय ३९ वर्ष रा. नेहरू वार्ड रामटेक ता. रामटेक हा हॉटेल चे काउंटरवर बसुन मिळाला. त्याला हॉटेल मालकाबाबत विचारणा केली असता त्याने आरोपी क्र २) सुभाष सावरकर, रा नेहरू वार्ड, रामटेक ता.रामटेक** हा नमुद हॉटेल चा मालक असल्याची माहीती पोलीसांना दिली. पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेलची झडती घेतली असता एक पिडीत महीला मिळुन आली. आरोपी क्र. १ आणि २ हे दोघे मिळुन हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता महीलांना पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन त्यांच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याबाबत पोलीसांची खात्री झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून दोन ॲड्रॉईड मोबाईलसह , रोख रक्कम ५०० /— रूपये आणि इतर साहीत्या असा १२,२३० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे.**

**आरोपी क्रं. १) मंगेश बापुराव कारेमोरे, वय ३९ वर्ष आणि आरोपी क्र. २) सुभाष सावरकर दोघेही रा नेहरू वार्ड, रामटेक ता.रामटेक यांच्या विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३,४, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्रं १ याला पोलीसांनी अटक केली आहे.**

# पोलीस स्टेशन बोरी हददीमध्ये हरविलेले/गहाळ झालेले मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन बोरी हददीमध्ये सन २०२४ ते २०२५ गहाळ झालेले वेगवेगळया कंपनीचे अॅड्रॉईड मोबाईलचा बोरी पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मदतीने तांत्रीक पदधतीने शोध घेवून CEIR पोर्टलचा वापर करुन ५ नागरिकांचे मोबाईल दिनांक १०/०६/२०५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथे त्याचे मुळ मालकांना परत केले. मोबाईल मुळ मालक नामे १)निखिल सुरेश वासे, रा. १४६ श्रीकृष्ण नगर , बुटीबोरी ,२) श्री प्रतिक सुभाष हडगे, रा. पुष्कर सोसायटी , बुटीबोरी , ३) भुषण कुंभलकर रा. सातगाव रोड, बुटीबोरी ४) सौ. बबीता निकेश सहारे, रा. बुटीबोरी ५) श्री गणपत बालकृष्ण चिकणकर, रा.बुटीबोरी यांना श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग यांच्या हस्ते त्यांचे मिळुन आलेले मोबाईल परत देण्यात आलेले आहे. सदर वेळी पोलिस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले ,प्रभारी अधिकारी पोस्टे बोरी यांचेसह बोरी पोलीस स्टेशन चे अधिकारी अंमलदार हजर होते. **यापुर्वी दिनांक ०८/०६/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत सुध्दा सावनेर पोलीसांनी २० मोबाईल त्यांच्या मुळ मालकाला परत केले आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचा मोबाईल हॅन्डसेट गहाळ झाल्या नंतर किंवा चोरीस गेल्यानंतर त्याची माहीती तात्काळ पोलीसांना द्यावी तसेच त्याबाबतची माहीती https://www.ceir.gov.in या पोर्टलवर माहीती भरून तक्रार नोंद करावी. त्यामुळे गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेता येईल.**



## प्रतिबंधीत कपास बियाणांची वाहतुक आणि साठा करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यां ची कारवाई

**दिनांक ०९/०६/२०२५ रोजी** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत कपास बियाणांची अवैधरित्या वाहतुक तसेच अवैधरित्या साठवणुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रमांक १ :—** **स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला** गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत कपास बियाणांची अवैधरित्या वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत** पोलीसांनी बोरखेडी जंगेश्वर

शिवार येथील अमृत पंजाबी ढाब्या जवळ नाकाबंदी केली असता संशयीत मारूती  एस क्रॉस कार क्रमांक एम एच ४७  के १२४५ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहन चालक व त्याच्या सोबत कार मध्ये असलेल्या इसमास  नाव पत्ता विचारला असता, वाहन चालक नामे **योगेश सिताराम पुरोहीत, वय ५४ वर्षे , रा. वर्धमान नगर डे.टु.डे च्या मागे नागपुर तसेच बाजुच्या सीटवरील इसमाचे नाव राजीब राघोबाजी खारकर, वय ५८ वर्षे , रा. सिंदी रेल्वे ता. सेलु जि. वर्धा**  अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी नमुद वाहनांची पंचासमक्ष तपासणी केली असता वाहनाच्या डिक्कीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत कपास बियाणे (कॉटल सिड्स) मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष **१. R cotton 999 BG.5  चे १९९ पॅकेट २. RAFEL BG.5 चे ४३ पॅकेट ,३. TILAK  BG.5 Premium Hybrid Cotton seeds चे ५० पॅकेट ,४.  दोन  ॲड्रॉईड फोन ,५. एस क्रॉस कार क्रमांक एम. एच. ४७  के १२४५ असा एकुण १०,२८,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**कारवाई क्रमांक २ :—** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन  केळवद अंतर्गत मौजा बिडगाव येथे **रमेश नत्थुजी घाटोडे, वय ५७ वर्षे, रा. बिडगाव** याने त्याचे राहते घरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत कपास बियाणांची अवैधरित्या साठवणुक करून ठेवली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीचे घरात धान्याचें कोठीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत कपास बियाणे (कॉटन सिड्स) मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष १) TILAK RESEARCH COTTON SEEDS चे १५ पॅकेट २) TILAK RESEARCH COTTON SEADS 5G चे १० पॅकेट  १) RADAR 4G HYBRID  COTTON SEEDS  चे १५ पॅकेट असा एकुण किंमती २१,०००/— रूपये असा एकुण किंमती ५६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**वरील आरोपीतांवर पोस्टे बोरी आणि पोस्टे केळवद येथे** कलम ३१८(४), ३(५) भान्यासं सहकलम ७ बियाणे अधि. १९६६ सहकलम ३ बियाणे १९८३ सहकलम १७, १५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, सहकलम बिज अधिनीयम १९६८ चे नियम ७,८,९,१०,११,१२,१३,१४ सह कलम महा. कापुस बियाणे विनिमय अधि २००९, २०१० चे नियम १० अन्वये  स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले आहे.


स्टेशन बुटीबोरी
नागपूर ग्रामीण
MH 47 K 1245


पोलीस स्टेशन, केळवद
नागपूर जिल्हा ग्रामीण

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने